शासनाच्या मालकीच्या हवाई वाहनांसाठी
<u>इंधन खरेदीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र.विचासं-१११७/प्र.क्र.२९३/ २८-अ,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक: २३ नोव्हेंबर, २०१७

वाचा :
१) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, परिपत्रक क्र.SPO-१२५६-IND-II, दि.२५.०९.१९५८.
२) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/ प्र.क्र.८२/ भाग III/ उद्योग-४, दि.०१.१२.२०१६.
३) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.विचासं-१११७/ प्र.क्र.२/२८-अ, दि.२९.०३.२०१७ चे इतिवृत्त.
४) या कार्यालयाचे पत्र क्र.डीए/ एडीएम/ १२६५/ २०१७, दि.०८.११.२०१७.

प्रस्तावना :

विमानचालन संचालनालयामार्फत राज्य शासनाच्या मालकीच्या हवाई वाहनांचा सांभाळ केला जातो. तसेच या हवाई वाहनाद्वारे राज्याच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासाची व्यवस्था पाहिली जाते. राज्य शासनाच्या या हवाई वाहनांमध्ये केंद्र शासन पुरस्कृत इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन, हिंदूस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन या कंपन्यांमार्फत केंद्र शासनाने ठरविलेल्या दरानुसार इंधन एअर टरबाईन फ्युएल (Aviation Turbine Fuel) भरण्यात येते. अद्यापपर्यंत संदर्भ क्र.१ येथील परिपत्रकाच्या अनुषंगाने सदर दोन्ही कंपन्यांमार्फत ही इंधन खरेदी केली जात होती. संदर्भ क्र.२ नुसार उद्योग, उर्जा व कामगार विभागाने शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदी साठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका जारी केली आहे. या नियमपुस्तिकेतील तरतुदीमध्ये हवाई वाहनांच्या इंधनाची बाब अंतर्भूत नसल्याने त्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१४ मार्च, २०१७ च्या बैठकीमध्ये मंजूरीकरीता ठेवण्यात आला होता. संदर्भ क्र.३ येथील इतिवृत्तानुसार शासनाच्या मालकीच्या हवाई वाहनांमध्ये इंधन पुरवठा खरेदीबाबतच्या प्रस्तावास मंजूरी दिली आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :

विमानचालन संचालनालयाच्या अखत्यारितील शासनाच्या मालकीच्या हवाई वाहनांमध्ये (विमान/हेलिकॉप्टर) केंद्र शासन पुरस्कृत इंडीयन ऑईल कॉर्पोरेशन, हिंदूस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन व भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन या कंपन्यांमार्फत केंद्र शासनाने वेळोवेळी ठरविलेल्या दरानुसार आवश्यक असणारे इंधन (ATF) खरेदी करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. या प्रित्यर्थचा खर्च क्र.ए-४, "२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) शासनाचे विमानचालन विषयक सल्लागार" या लेखाशिर्षातंर्गत "२४-

पेट्रोल, तेल व वंगण" या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हे आदेश विमानचालन संचालनालयाच्या विविध समस्यांवर निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१४.०३.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या दिनांक २९/३/२०१७ च्या इतिवृत्तातील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१७११२३१०५२०९४१०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shubhangi Suhas Agashe

Digitally signed by Shubhangi Suhas Agashe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=172255ef061cede931f38d47a523ff38ab66ea8d7033b5f7ebcf3045a75b6735, cn=Shubhangi Suhas Agashe
Date: 2017.11.23 10:56:48 +05'30'

(शुभांगी आगाशे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी सादर,

१. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. अपर मुख्य सचिव (वित्त), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. अपर मुख्य सचिव (नियोजन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. अपर मुख्य सचिव (सेवा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. अपर मुख्य सचिव (मा.मुख्यमंत्री कार्यालय), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
६. मा.राज्यपाल यांचे परिसहायक, राजभवन, मुंबई.
७. सर्व मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
९. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई ५६.
१०. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई ५६.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. महालेखापाल, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई ३२.
१७. निवड नस्ती.